I J R S S I S,Issue (VIII), Vol. II, Jan 2023 : 529-532
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# लोकसाहित्यातील स्त्रीजीवन

ज्योती पायघन
जनता महाविद्यालय चंद्रपूर

Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**
साहित्य समाजमनाचा आरसा आहे. साहित्यामुळे समाजातील घटनांचे ज्ञान प्राप्त होते. साहित्याच्या आस्वादाचा समाज आकलन होते. साहित्यनिर्मिती ही एका व्यक्तिची नसून समाजाची निर्मिती असते. माणूस हा मुळातच विचार करणारा प्राणी जे अज्ञात ते जाणून घेण्याची ओढ असते. जीवन जगत असताताना ज्या समस्या जाणवतात त्या सोडविण्याचा गट शोधाचा जन्म होतो. यातूनच लोकसाहित्याची निर्मिती होते. लोकसाहित्य हे समुहमन असते. समुहनिर्मिती असते. देश-काल -परिस्थितीनुसार त्यात बदलही होतो. लोकवाङ्मय ही समाजाची परंपरागत मौखिक संपत्ती असते.

**बिजशब्द :** संभाषन श्रवण मृदुकौशल्य यक्तिमत्व विकास .

**प्रस्तावना :**

भारतीय लोकसाहित्याला प्राचीन समृद्ध अशी वैविध्य आहे. या लोकसाहित्याची मुळे प्राचीन वैदिक वाड्.मयात आढळतात. व्यक्तीच्या जन्मापासून ते अंत्यविधीपर्यंतचे धर्माविध पर्यटन गाणारी गाणी सर्व भाषांत प्रचलित आहे

निरनिराळया प्रदेशातील लोकवाड्.मयात शिव-पार्वती]राधा-कृष्ण]राम-सीता यांच्या रुपाने लोकजीवन अधोरेखीत झालेले असते. म्हणूनच लोकसाहित्यातील स्त्री-जीवनाचा मागोवा घेतांना लोक साहित्यातील स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास करावा लागेल.

लोकवाङ्मयातील साहित्य प्रकारात वैविध्वता आहे. म्हणी]कोडी]कथा]कहाण्या]ओव्या]उखाणे]गीते]पाळणे] खेळाची गाणी] अंगाईगीत]लग्नगीत इत्यादी स्त्रीयांना विशेष गीतांची आवाड दिसते. लोकसाहित्यातील पद्य वाङ्मयातून स्त्रीजीवनाच्या विविध छाप प्रतिबिंबीत झालेल्या दिसतात. स्त्रीयांच्या मौखिक ओवीचा उल्लेख तसेच दळण-कांडणाशी असणारा सबंध इसवीसनाच्या सहाव्या शतकापासूनच्या जैनाच्या बृहत्कल्पसुत्र भाष्यामध्ये आढळतो.

*"जई कुट्टिणीउ गायंति साइयाऊ मसुलेही।*
*विलंवंतीस सकलुण मह हितय किमाकुलीभवास॥"*

दळण- कांडणाच्या वेळी स्त्रिया गाणी गातात असा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे सोमेश्वर नृपतीच्या 'मानसोल्लास' या ग्रंथातही स्त्रियांच्या मौखिक गाण्यांचे उल्लेख आढळतात. महानुभाव वाङ्मयातील महदंबेचे 'धवळे' याच प्रकारातील आहे.

इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर सर विल्यम जोन्स (१९४६-१९९४) यांनी संस्कृत भाषा ध्ययनाच्या रुपाने तौलनिकभाषाशास्त्राच्यानिमित्यानेभारतीयसाहित्यवसंस्कृतीयाविषयीजागतिकअभ्यासकांमध्येकुतूहलनिर्माणकेले.त्यापाठोपाठतौलनिकदैवतशास्त्रआणितौलनिकआचारशास्त्र.इतिहासइत्यादीविषयांकडेअभ्यासकआकर्षिलेगेले. मराठीलोकसाहित्यावरइंग्रजीलिखाणकरणाऱ्यामेरीफिअरहिचाआरंभीयउल्लेखकरावालागेल.भारतावरीब्रिटिश

सत्तेच्याकाळातमुंबईचेकाहीकाळगव्हर्नरअसलेलेसरबार्टलफ्रिअरह्यांचीमेरीहीकन्यातिचीदाईॲनालिबरीडिसूसाहिचेघराणेमुळेचेकलकत्याचेतिनेमेरीलाकाहीमराठीलोककथासांगीतल्याआणिमेरीनेत्याओल्डडेक्कनडेम(१८८६) ह्या नावाने प्रसिद्ध केल्या इंग्रजीत आणलेल्या ह्या मराठी लोककथांना यूरोपमध्ये फार लोकप्रियत मिळाली. जर्मन, हंगेरियन, डॅनिश अशा यूरोपीय भाषांमध्ये मेरीचे हे पूस्तक अनुवादिले गेले. अश्या प्रकारे मराठी लोककथा (लोकसाहित्य) युरोपीय भाषांत निवेदिले गेले.

मानववंश शास्त्रांर्ततग संस्कृती व लोकसाहित्य या दृष्टीने पाश्चिमात्य संशोधकांना भारत ही नेहमीच समृद्ध वाटत आली आहे. त्यांचे प्रयत्न सैद्धांतिक विश्लेषणाचे आहेत. भारतीय अभ्यासक मात्र अजूनही संकलन सग्रंहाच्या भूमिकेतच गुंतलेले आहे. लोकसाहितयाचे पाश्चिमात्य अभ्यासकांचे विविध संप्रदाय आहेत. समाजशास्त्र, मानवशास्त्र, भाषाशास्त्र, मानवशास्त्र इ. विविध दृष्टीकोनातून हे अभ्यासक काम करतांना दिसतात.

भारतीय लोकसाहित्य उभारकांनी मात्र स्वत:ला कोणत्याच संप्रदायाशी बांधून घेतलेले नाही. त्यांचे क्षेत्र मुक्त आहे. सैद्धांतिक भूमिका नसल्याने अभ्यासकांमध्ये एक प्रकारचा विस्कळीत पणा आहे.

महाराष्ट्रातही स्वातंत्र्योत्तर काळात लोकसाहित्य समिती स्थापन झाली. (१९५६)चि.ग.कर्वे हे तिचे पहिले अध्यक्ष होते. या समितीने महाराष्ट्रातील लोकसाहित्य संकलनाचे व्यापक प्रयत्न केले होते. मात्र ही संकलने मोठ्या प्रमाणावर कथा-गीतांचे संकलने होते. लोकसाहित्य संकलनाची अनेक पुस्तके समितीने प्रकाशीत करून पुढील अभ्यासकांसाठी भरपूर सामग्री संकलित करून ठेवली. १९७९-८० मध्ये नवीन अभ्यासकांनी डॉ. प्रभाकर मांडे यांच्या पुढाकाराने एकत्र येवून “ लोकसाहित्य संशोधन मंडळ” या संस्थेचा प्रारंभ केला. आधीपासूनच लोकसाहित्याचे अभ्यासक व संशोध करणारे डॉ. मांडे, डॉ.रा.चि.ठेरे, दुर्गा भागवत प्रा. नरहर कुरूंदकर यांनी या मंडळाची मुहुर्त मेढ रोवली. तेव्हापासून दरवर्षी लोकसाहित्य संशोधन मंडळ महाराष्ट्रातल्या विविध ठिकाणी अभ्यासकांची परिषद घेते. औपचारिक – अनौपचारिक पद्धतीने अभ्यास करणारे लोकसाहित्य-अभ्यासक एकत्र येतात. व शोधनिबंध सादर करतात.

**लोकगीत आणि स्त्रिया परस्पर सबंध :-**

स्त्री जीवनाच्या विविध छटा या प्रतिबिंबित झाल्या आहे. जात्यावर स्त्रिया ज्या-ज्या ओव्रा गात त्यातून त्यांच्या समजूती, चालीरीती, सुख-दु:ख, नातेसबंध यांचे दर्शन घडत जाते चैत्रगौरी व डोहाळे, हळदीच्या कार्यक्रम प्रसंगी गाणी म्हणण्याची प्रथा आजही रूढ आहे. यातून आपल्या भावना स्त्रिया प्रकट करतात. अश्या या लोकगीतांच्या जडण-घडणीत स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे. स्त्री ही श्रद्धाळे व संवेदनक्षम असल्यामुळे दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटना अनुभव लोकगीतातून मांडतात. त्यामुळेच लोकजीवन चालीरीती चित्रपटातून दाखवितांना त्या भावना गीतातून व्यक्त होतात. उदा. “हम आपके है कौन” या चित्रपटातील

*१. ‘माये न माये दर पे तेरे*
*बोल रहा है कागा’*

*२. ‘दिदि तेरा देवर दिवाना’*

*३. ‘नेसली माहेरची साडी’*

ही गीते चालीरीती व परंपरा दाखवितात. परंपरा ह्या स्त्रियांनीच समाजात चालविलेल्या मिळतात. स्त्री ही श्रद्धाळू व संवेदनक्षम व सहनशील असल्यामुळे दैनदिन

जीवनात घडणाऱ्या घटना, अनुभव, सुख-दु:ख, रागलोभ, वासल्य, स्नेह लोकगीतातून मांडतांना दिसते. स्त्रीने मांगल्य, पावित्र्य, श्रद्धा या तीन गोष्टींचा स्त्रियांच्या जीवनात विशेष महत्व आहे. भलेही ती कोणत्याही धर्माची असो. स्वत:च्या भावना जेव्हा प्रकट करू शकत नाही तेव्हा सीता, द्रौपदी, पार्वती, तारामती यांच्या रूपाने ते भाव गीतातून प्रकट करतात. तसेच ग्रामदैवतांनाही तीच्या जीवनात विशेष स्थान आहे. सण-उत्सवाप्रसंगी एकत्र येवून जीवनातील आनंद लुटतांना स्त्री लोकसाहित्यातून पाहावयास मिळते.

पारंपरिक व्यवस्थेत स्त्रियांचे संपूर्ण आयुष्यच सासर माहेराशी बांधलेले असते. लोकसाहित्यातील स्त्रीआपल्याजीवनातपतीलादेवाइतकेचमहत्वाचेस्थानदेते.अहेवमरणस्वीकारणारीस्त्रीलोकसाहित्यातूनदिसते.

*सासु-सासरेआहेतदेव्हारीचेदेवू।*

*त्याचेआधीमासेबाईनकोजेवू।*

असा आदर तिच्या अंगवळणी संत्कारातून निर्माण केला जातो.

स्त्री-जीवनाच्या विविध भाव लोकसाहित्यातून पहावयास मिळतात. दळण-कांडण, निवडणे, टिपणे, नामकरणविधी, लग्नसमारंभ, हळदीकुंभ अश्या सणा उत्सवात स्त्रियांचा सहभाग महत्वाचा असतो."[२]

**स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय स्त्री:-**

स्त्रीवादाची संकल्पना मांडतांना आधुनिक भारतीय स्त्री ला अनेक घटना प्रसंगातून व चळवळीतून नव्या रुपाची जाणीव होवू लागली आहे. सुशिक्षित झाल्यामुळे प्रसारमाध्यमातून स्त्रियांच्या अन्यायाला वाचा फुटू लागली. अनेक स्त्री संघटनांनी स्त्रियांच्या प्रश्नांवर आंदोलने करून लोकमत जागृत केले. स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होऊन तिला तिच्या अधिकाराचे महत्व कळणे होय. स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या इतिहासातील एक नवा आशय एक नवा विचार, एक नवी दिशा, समान हक्क, समान संधी, समान दर्जा आणि स्वातंत्र्य हा स्त्रीवादाचा गाभा ठरतो. "पुरुष हा प्रथम महत्वाचा किंवा प्रधान, तर स्त्री ही दुय्यम किंवा गौण, धर्म, कायदा, शिक्षण विज्ञान व तत्वज्ञान या सर्वच क्षेत्रामध्ये पुरुषप्रधान व पुरुषकेंद्री विचार चौकटीने स्त्रीकडे अभाववादी न्यूनवादी दृष्टीकोनातून पाहिलेले आहे".[३]

"मानव म्हणजे पुरुष-स्त्री हे त्याचे उपांग ह्या विचाराला छेद देणारे, त्याबद्दल प्रश्न निर्माण करणारे त्यातील जरित्तता धुसरता याची जाणीव करुन देणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल."[४]

स्त्री लेखनाची परंपरा जाणीवपूर्वक निर्माण करुन भारतीय स्त्रियांच्या लेखनाचा इतिहास निर्माण करण्याचा प्रयत्न "विमेन रायटिंग इन इंडिया" या ग्रंथाने केला.

यात बुद्धकालीन थेरी गाथांपासून व भक्तिकाळातील स्त्रियांचे लेखन, आधुनिक काळातील स्त्रियांची चरित्रे, आत्मचरित्रे एकवटलेले आहे. महाराष्ट्रातील महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, ताराबई शिंदे, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक, यांच्यापासून तर आजच्या कथा कादंबऱ्यापर्यंत विपूल स्त्रीवादी साहित्य निर्माण झाले."[५]

स्त्री हजारो वर्षापासून पुरुषप्रधान संस्कृतीत जगत असते तरीही आपल्या भावनेला व विचारांना तीने ओवीगीते, उखाणे, म्हणी लोककथांच्या माध्यमातून वाट मोकळी केली. लोकसाहित्यातही काही स्त्रियांनी आपल्या वेदना, दु:ख मांडल्या आहेत. त्याच प्रेरणेतून स्त्री-वादी साहित्याचा जन्म झालेला आहे. सावित्रीबाई

फुले, ताराबाई शिंदे, विद्याबळ, छाया दातार, विभावती शिरूरकर, शांता शेळके, इंदिरा संत यांच्यापासून तर मलिका अमर शेख यांच्या मर्यंतच्या लेखिकांनी विविध रूपे साहित्यातून प्रकट केली.

दलित, आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीतील स्त्रियांचे प्रश्न खोल गर्तेत रुतून बसले आहे. स्त्रीमुक्ती, स्त्रीवाद याची जाणीव त्यांना अजून झाली नाही. डॉ.बा.आंबेडकर यांच्या प्रेरणेतून दलित स्त्री चळवळ उभारत आहे. कुमुद पावडे, बेबी कांबळे, शांताबाई कांबळे, जनाबाई गिऱ्हे विमल मोटे यांच्या साहित्यातून स्त्रीमुक्तीचा हुंकार येतो. शिक्षित व अशिक्षित समाजात खूप अंतर आहे.

१. संपन्नतेच्या वरच्या टोकाला असणाऱ्या स्त्रीमुक्तीचा पाश्चात्य जीवनाचे अनुकंपा करणे.

२. मुक्त स्त्री-पुरुष संबंध, अतिरेकी व्यक्तिवाद याभोवती केंद्रीत झालेला आहे.

३. लोकसाहित्यातील स्त्री मनाची उदात्तता आजच्या स्त्रीवादी साहित्यात म्हणावी तशी दिसत नाही.

४. व्यक्तिवादी प्रथा आणि परंपरागत कुटूंबव्यवस्था यातील ताण मिटवणाऱ्या पुनर्रचनेचा शोध घेणे आवश्यक आहे.

लोकसाहित्यातील स्त्री व स्त्रीवाद घेऊन जीवन जगणारी स्त्रीयांचे सुख-दु:ख, समस्या एकच असल्या तरी स्त्रीवादी साहित्यात व्यक्त होणारी भूमिका वेगळी आहे.

संतसाहित्यातून व्यक्त होणारी स्त्री-भावना लोकव्यवहारात होणाऱ्या बदलाचे सुचक दर्शन घडविते.

*"डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी।*

एवढेच नाहीतर विठ्ठलाला शिव्या देण्यासाठी जनाबाई कचरत नाही.

*अरे अरे विठ्या विठ्या। मुळ मायेचा काटस्था।*

या अंभगातून तीची भावना व्यक्त होते.

ही भावना जाच्यावर व्यक्ती जास्त प्रेम करते त्या व्यक्तिच्या बाबतीत जास्त घडते.

**निष्कर्ष:-**

१. संपन्नतेच्या वरच्या टोकाला असणाऱ्या समाजाचा स्त्रीमुक्तीच्या गोष्टी करणारा समाज पाश्चात्य जीवनाचे अनुकण करणारा आहे.

२. अतिरेकी व्यक्तिवाद व मुक्त स्त्री-पुरुष संबंध व्यक्तिवादाभोवती केंद्रीत झाला आहे.

३. लोकसाहित्यातील स्त्री मनाची उदात्तता आजच्या स्त्रीवादी साहित्यात म्हणावी तशी दिसत नाही.

४. व्यक्तिवादी प्रेरणा व परंपरागत कुटूंबव्यवस्था यातील ताण मिटवणाऱ्या पुनर्रचनेचा शोध घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**

ढेरे रा.चि – संत साहित्य आणि लोकसाहितय काही अनुबंध श्री विद्या प्रकाशन, पुणे.

व्यवहारे शरद, - लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप' कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद. पृष्ठ १३७

विजया राजाध्यक्ष – मराठी वाङ्.मयकोश' खंड चौथा समीक्षा संज्ञा मुंबई पृष्ठ ४०९

विजया राजाध्यक्ष – मराठी वाङ्.मयकोश' खंड चौथा समीक्षा संज्ञा मुंबई पृष्ठ ४११

डॉ.द.के. गंधारे – 'समीक्षे या अक्षर गंध' स्नेहवर्धन प्रकाशन पुणे- पृष्ठ २४

ढेरे रा.चि. लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा पुणे १९९०.